RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक ४९] बुधवार, सप्टेंबर १७, २०२५/भाद्रपद २६, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ६२

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी, पालघर (पुनर्वसन शाखा) पालघर यांजकडून

मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पासाठी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये

घोषणा

क्रमांक/पुनर्वसन/NHSRCL/कलम-१९/टे-२/कावि-६५८/२०२५.—ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून दिनांक ०६/०३/२०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या **अनुसूची-एक** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, **अनुसूची-दोन** मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतूदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, **अनुसूची-तीन** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश **अनुसूची-चार** मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी वसई तालुक्याकरीता उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), पालघर यांस पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

गाव – चंद्रपाडा, तालुका – वसई, जिल्हा – पालघर

अ.क्र.	भूमापन किंवा सर्व्हे नंबर/ गट क्रमांक	संपादित क्षेत्र (हे.आर)
(१)	(२)	(३)
१	२०६/१८	०.५१.५५
२	२०६/२१	०.६४.६०
३	२०६/२३	०.०३.००
४	२०६/१	०.२०.३५
५	२०६/२	
६	२०६/४	
७	२०६/५	
८	२०६/६	
९	२०६/७	
१०	२०६/८	
११	२०६/९	
१२	२०६/१०	
१३	२०६/११	
१४	२०६/१२	
१५	२०६/१३	
१६	२०६/१५	
१७	२०६/१६	
१८	२०६/१७	
१९	२०६/१९	
२०	२०६/२०	
२१	२०६/२२	
२२	२०६/प्लॉट नं./४	
२३	२०६/भू.क्र./८	
एकूण		**१.३९५०**

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प ता. वसई, जिल्हा पालघर
प्रकल्पाच्या कामाचे वर्णन	**मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प** रेल्वे मंत्रालय, भारत सरकार यांनी भारतीय रेल्वे योजना २०२० तयार केली आहे आणि त्या योजनेचा दस्तऐवज डिसेंबर २००९ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. सदर प्रकल्प जपान सरकारच्या सहाय्याने कार्यान्वित करावयाचा आहे. प्रकल्पाची एकूण लांबी ही ५०८.१७ कि.मी. असून त्यापैकी १५५.६४२ कि.मी. लांब इतका रेल्वे मार्ग महाराष्ट्र राज्यामधून (बोगद्यातून २७ कि.मी. व १२७.६४२ उन्नत मार्ग) जातो. महाराष्ट्र राज्यातील या अंतरामध्ये ४ स्थानके (बांद्रा कुर्ला संकूल, ठाणे, विरार व बोईसर) नियोजित केले आहेत. रेल्वे चालनाचा वेग प्रती तास ३२० कि.मी. इतका असेल.
समाजाला होणारे लाभ	मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पामुळे जलदगती रेल्वे प्रकल्प बांधकाम करणे, त्याचा वापर करणे व देखभाल करणे याकामी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगाराच्या संधी मिळतील. तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतुकीत वाढ, सुरक्षित आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वकष विकास, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती, पर्यावरण स्थिरता ह्या बाबी अभिप्रेत आहेत.

अनुसूची-तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

(१) प्रकल्पाचे बांधकाम

(२) प्रकल्पाचे परिचालन

(३) प्रकल्पाच्या देखभालीखाली

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता.

अनुसूची-चार

भूमी संपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १०८ नुसार १) जमिनीचे मूल्यांकन व २) पुनर्वसन व पुनर्स्थापना अंतर्गत घटकांबाबत राज्य शासनाचे धोरण निश्चित केलेले आहे, त्यानुसार मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पाकरिता भूमी संपादन अधिनियम, २०१३ मधील दुसऱ्या अनुसूचीनुसार तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२७/०८/२०१४ नुसार देय लाभाचा सारांश

पुनर्वसन व पुनर्स्थापना अंतर्गत घटक –

(१) जर ग्रामीण भागात घर गमावले तर इंदिरा आवास योजनेच्या निकषानुसार बांधलेले घर किंवा त्याऐवजी नियमानुसार अनुज्ञेय रक्कम देय राहील. किमान र. रु. १,६५,०००/-.

(२) जर शहरी भागात घर गमावले तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषानुसार ५० चौ.मी. जोते क्षेत्र असलेले घर किंवा त्याऐवजी नियमानुसार अनुज्ञेय रक्कम देय राहील. किमान र. रु. ५.५ लाख देय राहील.

(३) जर कुटूंबात रोजगारासाठी पात्र उमेदवार असेल अशा प्रत्येक बाधित कुटूंबाला एकदाच ५ लाख रुपये दिले जातील.

(४) बाधित स्थलांतरीत कुटूंबाला दरमहा र. रु. ३,०००/- निर्वाह भत्ता स्थलांतराच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी. अनुसूचित जाती आणि जमातींच्या अशा कुटुंबांना अतिरिक्त र. रु. ५०,०००/- देय राहील.

(५) बाधित स्थलांतरीत कुटुंबाला र. रु. ५०,०००/- वाहतूक खर्च देय राहील.

(६) ज्या कुटुंबांकडे जनावरांचा गोठा किंवा छोटे दुकान होते, अशा कुटुंबाला एकदाच र. रु. २५,०००/- आर्थिक मदत देय राहील.

(७) कारागीर, छोटे व्यापारी यांना एकदाच र. रु. ५०,०००/- अनुदान देय राहील.

(८) घर बदलल्यानंतर एकदाच र. रु. ५०,०००/- पुनर्स्थापना भत्ता देय राहील.

(९) पुनर्वसन झालेल्या व्यक्तीच्या केवळ पहिल्या व्यवहारासाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क हे संबंधित संपादन संस्थेकडून भरले जाईल.

(१०) बाधित व्यक्तीने लेखी स्वरुपात संमती दिली तर वर उल्लेख केलेले पॅकेज अनुज्ञेय होईल.

अनुसूची-पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ	**प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम**	उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), पालघर
ब	**प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता**	उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) जिल्हा मुख्यालय, पालघर, पालघर बोईसर रोड, कोळगाव, ता.पालघर, जि.पालघर ४०१ ४०४
क	**ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील**	महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, वर्ष ५, अंक ९२ (२) गुरुवार, जुलै ११, २०१९/आषाढ २०, शके १९४१, महसूल व वनरु विभाग, अधिसूचना दिनांक ०९ जुलै २०१९ अन्वये उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांची प्रशासक, पुनर्वसन व पुनर्स्थापना म्हणून नियुक्ती करणेत आली आहे.

तेजस चव्हाण,
सक्षम प्राधिकारी,
मुंबई अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प तथा
उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), पालघर.

डॉ. इंदु राणी जाखड,
जिल्हाधिकारी, पालघर.

ठिकाण पालघर,
दिनांक १६ सप्टेंबर २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.